


# हौसाबाई होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजमध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ स्थापना दिवस साजरा

**जयसिंगपूर/प्रतिनिधी–**

निमशिरगाव (ता.शिरोळ) येथील कै. श्रीमती हौसाबाई होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल येथे २५ वा रौप्यमहोत्सवी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ स्थापना दिवस साजरा करण्यात आला.

कॉलेजमध्ये २५ वा रौप्य महोत्सवी MUHS स्थापना दिवस साजरा केला. अंतिम वर्षाच्या BHMS UG विद्यापीठाचे प्रतिनिधी सौरभ मेटकर याच्या हस्ते MUHS फाउंडेशनच्या दिवसाच्या निमित्ताने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा ध्वज फडकावला आणि त्याचबरोबर सर्वांनी विद्यापीठ गीत गायले. प्राचार्य डॉ.शुभांगी मगदूम यांनी दिवसाची थोडक्यात माहिती करून दिली. कार्यक्रमास सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# विज्ञान विद्यापीठ स्थापना दिनानिमित्त मगदूम वैद्यकीय विद्यालयात ध्वजारोहण

**जयसिंगपूर/महान कार्य वृत्तसेवा**

येथील कै. श्रीमती हौसाबाई मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल निमशिरगांव येथे २५ वा रौप्यमहोत्सवी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठ स्थापना दिवस सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



विज्ञान विद्यापीठ स्थापना दिनानिमित्त मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल येथे विद्यापीठातील बी.एच.एम.एस. यु.जी. विद्यापीठाचे प्रतिनिधी सौरभ मेटकर यांच्या हस्ते एम.यु.एच.एस. फौंडेशनच्या स्थापनेनिमित्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा ध्वज फडकावण्यात आला. यावेळी विद्यापीठ गीत गायन झाले. कार्यक्रमात प्रा. डॉ. शुभांगी मगदूम यांनी विज्ञान विद्यापीठ दिनाची थोडक्यात माहिती करून दिली.यावेळी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.